MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

● वर्ष : १४ अंक : ६ पाने : ८ ● ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० ■ E-Magazine visit us on : www.mahatransco.in

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

चालू वित्तीय वर्षात २०२०-२०२१ मधील जवळपास सहा महिने संपले आहेत. या अर्ध्या वर्षात आपण सर्वांनी कोरोना महामारीवर लढा देत एक चांगली कामगिरी बजावली आहे.

या महामारीच्या काळात आपण अनेक गोष्टी नव्याने शिकलो. डिजिटल तंत्रज्ञानाचा खूप चांगला पर्याय यामुळे आपल्यासमोर आला. आपल्या अनेक बैठका, सकारात्मक चर्चा या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगव्दारे झाल्या. त्याचे अनेक फायदे आपण पाहत आहोत.

- **कंपनीची 'लक्ष्ये' (Targets) पूर्ण करा**
- **डिजिटल तंत्रज्ञानाचा चांगला फायदा**
- **कोरोना काळातही चांगली कामगिरी**
- **गुणात्मक सुधारणांवर भर द्यावा**

या सहा महिन्यांत आपण अनेक आव्हानांना सामोरे गेलो. पावसाचे लांबणे व निसर्ग चक्रीवादळ यामुळे अनेक आव्हाने समोर आली. परंतु, ती काळजीपूर्वक हाताळण्यात आपण यशस्वी ठरलो, याचा मला सार्थ अभिमान आहे.

सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी आपले कर्तव्य बजावत चांगली कामगिरी पार पाडली. या दरम्यान, अनेक विभागांचा सखोल आढावा घेतला. त्यामध्ये मला आवर्जून सांगावेसे वाटते की, अजूनही अनेक बाबींवर आपण सुधारणा करू शकतो. मी या संदर्भात नेहमी आपल्यापेक्षा प्रगत असलेल्या कंपनीशी सकारात्मक तुलना करतो. ज्यामध्ये पॉवरग्रीड, टाटा, अदानी अशा कंपन्या व त्यांचे व्यवस्थापन यांच्याशी मी जेव्हा तुलना करतो, तेव्हा मला हा फरक प्रकर्षाने जाणवतो.

या कंपन्यांचे सादरीकरण पाहण्याचे व त्यांचे अवलोकन करण्याच्या अनेक संधी मला मिळाल्या. त्यामध्ये त्यांची सचोटी, क्रिएटिव्हीटी, मेथॉडॉलॉजी, सुटसुटीतपणा पाहून मी खूप प्रभावित झालो. मला अशा प्रकारच्या कामाची अपेक्षा आपणा सर्वांकडून आहे.

कोणत्याही किचकट व गुंतागुंतीच्या विषयाची मांडणी पध्दतशीरपणे केल्यास तो समजण्यास सोपा होतो. आपल्या सादरीकरणावरून आपल्या कंपनीची प्रतिमा तयार होण्यास मदत होते. त्यामुळे ते अतिशय स्वच्छ, सुरेख, पध्दतशीर, क्रिएटिव्हपणे करणे महत्त्वाचे आहे. कोणताही विषय आपल्याला पध्दतशीरपणे मांडता आला पाहिजे. भाषा त्यासाठी उच्च दर्जाची वापरणे गरजेची असते. तसेच त्या विषयाची मांडणी व सादरीकरणही तितकेच महत्त्वाचे असते. मी प्रत्येक विभागप्रमुखांना आवाहन करतो की, त्यांनी याबाबत आपल्या सर्व सहकारी व कर्मचाऱ्यांना अवगत करून त्यामध्ये गुणात्मक सुधारणा कराव्यात.

आपण सर्वजण आपल्या कामामध्ये कुशल व तज्ज्ञ आहात. आपल्या अभियांत्रिकी ज्ञानाला व अनुभवाला तोड नाही. परंतु, प्रशासकीय गुणांत आपण आणखीन भरीव सुधारणा करू शकतो. कंपनीमध्ये जेव्हा आपण वरिष्ठ पदावर कार्यरत असतो, तेव्हा आपल्याला प्रशासकीय गुणांवर जास्त भर द्यावा लागतो. हे आपल्या सर्वांना ज्ञात आहे.

आपण जे काही करणार व वागणार त्यावर आपल्या कंपनीचे 'कल्चर' व त्यानुसारच कंपनीची प्रतिमा घडत असते. त्यामुळे आपण सर्वांनी त्याकरिता जागरूक राहिले पाहिजे. त्यासाठी एक चांगले 'कल्चर' घडविण्यास आपण एक मोठी व महत्त्वाची भूमिका बजावली पाहिजे.

चालू वित्तीय वर्षात अर्थात पुढील सहा महिन्यांतसुध्दा आपण भरीव कामगिरी कराल, याची मला खात्री आहे. सर्व विभागांना व्यवस्थापनाने जी ठरवून दिलेली कामाची 'लक्ष्ये' (Targets) आहेत. ती पूर्ण करण्याकरिता व्यवस्थापनाकडून कोणतीही संसाधने लागल्यास ती त्यांना प्राप्त करून देण्याबाबत व्यवस्थापन कटिबध्द आहे.

या दरम्यान, व्यवस्थापनाने अपघात या विषयावर सखोल मंथन केले. आपण कंपनीमध्ये शून्य अपघात (Zero Accident) होण्याचे 'लक्ष्य' (Target) व्यवस्थापनाने दिलेले आहेत. त्याकरिता विविध कार्यप्रणाली सुचित करून दिली आहे. त्यामध्ये Safety Norms, Awareness, Accident Analysis, Reward & Punishment अशा



**दिनेश वाघमारे** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

अनेक बाबी अंतर्भूत करण्यात आल्या आहेत. आपल्या सर्वांना सुध्दा व्यवस्थापनाचे आवाहन आहे की, शून्य अपघाताचे लक्ष्य (Target) पूर्ण करण्याकरिता आपण सर्वांनी सहकार्य करावे.

हळूहळू जनजीवन पूर्वपदावर येत आहे. त्यामुळे व्यवस्थापनातर्फे प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचे प्रयत्न होणार आहेत. या दरम्यान, आपण ऑनलाईन प्रशिक्षण घेत होतो. आता व्यवस्थापन प्रशिक्षणाचे पूर्वीचे दालन सुरू करण्याच्या प्रयत्नात आहे. त्याचा आपल्या सर्वांना आपल्यामध्ये गुणात्मक वाढ करण्यास मदत होईल, याचा मला विश्वास आहे.

Review व monitoring हे व्यवस्थापनाचे उत्कृष्ट माध्यम आहे. त्याचा सर्व कक्षप्रमुख व विभागप्रमुखांनी उपयोग करावा. Periodic Review व Monitoring मुळे आपली लक्ष्ये (Targets)/Action/Gap वर नियंत्रण ठेवण्यास मदत होते. महापारेषण कंपनी २०२०-२०२१ वित्तीय वर्षाचे संपूर्ण लक्ष्ये (Targets) पूर्ण करण्यात यशस्वी ठरेल, याबाबत मला खात्री आहे.

**शुभेच्छांसह..!**

**– दिनेश वाघमारे**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक




मुंबई : विक्रोळी प्रकल्पाच्या अनुषंगाने मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. याप्रसंगी खासदार श्री. विनायक राऊत, मुख्य सचिव श्री. संजय कुमार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार श्री. अजोय मेहता, अतिरिक्त मुख्य सचिव श्री. आशिष सिंह, प्रधान सचिव श्री. विकास खारगे, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. असीमकुमार गुप्ता, महापारेषण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे.

## ■ मुंबईला अखंडित वीजपुरवठा करण्याची गरज ■

# विक्रोळी ४०० के.व्ही. उपकेंद्र प्रकल्प वेळेत पूर्ण करा : मुख्यमंत्री

■ ***टीम महापारेषण, मुंबई***

मुंबईची पुढील काळातील विजेची गरज भागविण्यासाठी विक्रोळी येथे प्रस्तावित ४०० के.व्ही. जी.आय.एस. उपकेंद्र प्रकल्पाचा आढावा घेऊन हे काम तातडीने सुरू करुन २०२३ पर्यंत पूर्ण करावे, असे निर्देश मुख्यमंत्री श्री. उध्दव ठाकरे यांनी दिले.

विक्रोळी प्रकल्पाच्या अनुषंगाने मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी खासदार श्री. विनायक राऊत, मुख्य सचिव श्री. संजय कुमार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार श्री. अजोय मेहता, अतिरिक्त मुख्य सचिव श्री. आशिष सिंह, प्रधान सचिव श्री. विकास खारगे, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. असीमकुमार गुप्ता, महापारेषण कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यावेळी उपस्थित होते.

मुंबईसाठी महत्त्वपूर्ण ठरु शकेल, असा हा विक्रोळी प्रकल्प प्रकल्प आहे. या प्रकल्पांतर्गत मुंबईसाठी १००० मेगावॅट वीजपुरवठ्यासाठी अतिरिक्त व्यवस्था २०२३ पर्यंत निर्माण करणे अपेक्षित आहे. त्यासाठी खारघर उपकेंद्र येथून ४०० के. व्ही. वीजवाहिनी उभारणे प्रस्तावित आहे. तसेच तळेगाव-कळवा ४०० के. व्ही. वीजवाहिनीवरुन विक्रोळीपर्यंत ४०० के. व्ही. वीजवाहिनी तसेच पडघा, नवी मुंबई या ग्रीड उपकेंद्राशी जोडणी करणे आदी बाबी समाविष्ट आहेत. त्यामुळे मुंबईसाठी १००० मेगावॅट विजेसाठीची अतिरिक्त व्यवस्था निर्माण करणे प्रस्तावित आहे, अशी माहिती प्रधान सचिव श्री. असीमकुमार गुप्ता यांनी यावेळी दिली.

ठरल्याप्रमाणे टाटा पॉवर कंपनीने आठवड्यापर्यंत विक्रोळी प्रकल्प उभारणीसाठी जागा अदानी ट्रान्समिशन लिमिटेडला हस्तांतरीत करण्याचे कंपनीच्या अधिकाऱ्यांनी मान्य केले. जागेच्या ताब्यानंतर प्रकल्पाचे काम कोणत्याही स्थितीत २०२३ पर्यंत पूर्ण झाले पाहिजे, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.



***राज्य भार प्रेषण केंद्राची (SLDC) कार्ये***

विजेचे नियोजन आणि वहन करणे






मुंबई : महापारेषण, महावितरण आणि महानिर्मिती या तिन्हीही वीज कंपन्यांच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेताना राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत. याप्रसंगी ऊर्जा राज्यमंत्री श्री. प्राजक्त तनपुरे, प्रधान सचिव श्री. असीम गुप्ता, महापारेषणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे, महानिर्मितीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय खंदारे.

■ कृती आराखडा राबविण्याचे तिन्ही कंपन्यांना आदेश ■

# वीज कंपन्यांनी उत्पन्नाचे नवे स्त्रोत शोधावेत : डॉ. नितीन राऊत

■ *टीम महापारेषण/टीम महावितरण/ टीम महानिर्मिती, मुंबई*

राज्यातील तिन्हीही वीज कंपन्यांची आर्थिक स्थिती चिंताजनक असल्याची गंभीर दखल घेत कंपन्यांनी आपला तोटा कमी करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत. तसेच उत्पन्नाचे नवे स्रोत शोधावेत, स्वतःकडे असलेली सर्व संपत्ती आणि त्याचे मूल्य वाढवावे, बाह्ययंत्रणांकडून घेतलेले कर्ज कमी करून भविष्यातील कर्जासाठी पत वाढवावी, असा कृती आराखडा (ॲक्शन प्लॅन) राबविण्याचे आदेश ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी तिन्हीही वीज कंपन्याना दिले.

राज्य सरकारच्या महापारेषण, महावितरण आणि महानिर्मिती या तिन्हीही वीज कंपन्यांच्या आर्थिक स्थितीचा त्यांनी आढावा घेतला. राज्याच्या वीज कंपन्यांचे आर्थिक आरोग्य तपासून पाहण्यासाठी ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी ही महत्त्वपूर्ण बैठक घेतली. यावेळी ऊर्जा राज्यमंत्री श्री. प्राजक्त तनपुरे, प्रधान सचिव (ऊर्जा) श्री. असीम गुप्ता, महापारेषणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे, महानिर्मितीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय खंदारे तसेच तिन्हीही कंपन्याचे वित्त संचालक उपस्थित होते.

## कर्ज फेररचना करणार

महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती या कंपन्यांच्या आर्थिक स्थितीबद्दल या तिन्हीही कंपन्यांच्या वतीने सादरीकरण करण्यात आले. प्रत्येक कंपन्यांनी बाह्य स्रोतांकडून घेतलेले कर्ज (Outstanding Loans) आधी चुकते करावे म्हणजे तीनही कंपन्यांची आर्थिक स्थिती व पत सुधारेल आणि वित्तसंस्थाकडून अधिक कर्ज मिळेल, अशा सूचनाही डॉ. नितीन राऊत यांनी दिल्या. तसेच जास्त व्याजदर द्यावे लागत असणाऱ्या कर्जाऐवजी कमी व्याजदराच्या कर्जाना प्राधान्य द्यावे आणि कर्जाची फेररचना करून घ्यावी, अशी सूचनाही त्यांनी केली.


तिन्हीही वीज कंपन्यांचा मालकी हक्क असलेल्या जमिनींची नोंद करणे, या जमिनी नावावर करणे, तसेच तिन्ही वीज कंपन्यांनी उत्पन्नाचे नवे स्रोत शोधणे आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी गरजेचे असल्यावर डॉ. नितीन राऊत यांनी यावेळी भर दिला.

लॉकडाऊन काळातील वीज बिलात सवलत देतानाच राज्यातील नगरपालिका, महानगरपालिका आणि शासकीय कार्यालये यांच्याकडील प्रलंबित थकबाकी वसुल करण्याला प्राधान्य द्या. सर्व आमदार आणि पालकमंत्री यांना पत्रे पाठवून वीज बिल थकबाकी वसुली प्रकरणी सूचना मागवाव्यात. वीज बिल कमी यावे म्हणून अनेक ठिकाणी स्थानिक पातळीवर संगनमत करून महावितरणचा महसूल बुडवण्यात येत असल्याच्या तक्रारी समोर येतात. ही लूट थांबायला हवी, असे स्पष्ट आदेश डॉ. नितीन राऊत यांनी दिले.



*राज्य भार प्रेषण केंद्राची (SLDC) कार्ये*

संपूर्ण ग्रीडची निगराणी करणे






**मुंबई :** महापारेषणच्या पारेषण शुल्काच्या (ट्रान्समिशन चार्जेस) अनुषंगाने राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या अध्यक्षतेखाली एमएसईबी होल्डींग कंपनी सभागृहात बैठक झाली. त्याप्रसंगी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे, महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय खंदारे, महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, संचालक (वित्त) श्री. रवींद्र सावंत, महावितरणचे संचालक श्री. सतीश चव्हाण, महापारेषणचे मुख्य अभियंता श्री. शशांक जेवळीकर.

### ■ महापारेषणच्या मनोऱ्यांवरुन ऑप्टिकल फायबर ■

# वीजव्यवस्थेतील दुरुस्तीची संपर्क यंत्रणा होणार गतिमान : ऊर्जामंत्री

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महापारेषण कंपनीने उत्पन्नाचे अभिनव स्रोत शोधण्यासह यंत्रणेतील सुधारणेसाठी आधुनिकीकरण आणि नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करावा. वीजवाहिन्यांवरुन (ट्रान्समिशन लाईन) ऑप्टिकल फायबर केबल टाकून त्याद्वारे अंतर्गत संदेशवहन व्यवस्था प्रभावी करण्यासह उत्पन्नवाढीसाठी त्याचा व्यावसायिक वापर करण्याचे बिझनेस मॉडेल तयार करावे, असे निर्देश ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी दिले. त्यामुळे ट्रान्समिशनमध्ये आमूलाग्र सुधारणा होऊन राज्यातील वीज वितरणाच्या समस्या दूर होण्यास मदत होईल. तसेच दळणवळण (कम्युनिकेशन) क्षेत्रासाठी ही व्यवस्था मोठी फायदेशीर ठरुन ग्राहकांना जलद इंटरनेट सेवेचा फायदा मिळू शकेल, असेही डॉ. नितीन राऊत यांनी सांगितले.

महापारेषणच्या पारेषण शुल्काच्या (ट्रान्समिशन चार्जेस) अनुषंगाने डॉ. नितीन राऊत यांच्या अध्यक्षतेखाली एमएसईबी होल्डींग कंपनी सभागृहात बैठक झाली. त्यावेळी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे, महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय खंदारे, महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, संचालक (वित्त) श्री. रवींद्र सावंत, महावितरणचे संचालक श्री. सतीश चव्हाण यांच्यासह महापारेषण आणि महावितरणचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

राज्यात महापारेषणचे ४५ हजार कि. मी. लांबीचे वाहिन्यांचे जाळे असून या वाहिन्यांवरुन विजेच्या तारेखाली ऑप्टिकल फायबर केबल टाकून सर्व सबस्टेशन जोडता येतील. त्याचा फायदा पारेषणच्या संदेशवहन यंत्रणेत गतिमानता आणि आधुनिकता येऊन देखभाल दुरुस्ती तसेच कोठे बिघाड असल्यास तात्काळ त्यावर काम करणे सोपे होईल. मुंबईत १२ ऑक्टोबर रोजी झालेल्या वीजपुरवठा खंडित प्रकरणामुळे याची गरज अधिक असून त्यावर तात्काळ काम सुरू करावे, अशा सूचना डॉ. नितीन राऊत यांनी दिल्या.

डॉ. नितीन राऊत म्हणाले, ऑप्टिकल फायबरव्दारे आंतरजाल सेवा पुरवठादार, ब्रॉडबॅन्ड कंपन्यांना जलद इंटरनेट पुरविणे शक्य होणार असून महापारेषणचे राज्यभर असलेले जाळे यासाठी फायदेशीर ठरणार आहे. यामधील व्यावसायिक उत्पन्नाची संधी शोधण्याच्या दृष्टीने एक उत्कृष्ट 'बिझनेस मॉडेल' तयार करा. त्यासाठी या क्षेत्रातील तज्ज्ञ सल्लागारांची सेवा घ्यावी, असे निर्देशही डॉ. राऊत यांनी दिले. ट्रान्समिशनचे राज्यात ८६ हजार मनोरे (टॉवर्स) असून त्यावर मोबाईल सेवेसाठी अँटेना उभारणे शक्य आहे. तसा प्रयोगही दोन ठिकाणी करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली. त्यावर मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी बिझनेस मॉडेलमध्ये त्याचा समावेश करावा, अशा सूचना दिल्या. बैठकीमध्ये महापारेषणच्या भविष्यातील योजना, ट्रान्समिशन चार्जेस, प्राधान्यक्रमाने हाती घ्यायच्या उपाययोजना आदी अनुषंगाने चर्चा करण्यात आली.

महापारेषणसह वीजवहनाचे (पारेषण) अधिकार असलेल्या (लायसेन्सी) अन्य ७ खासगी कंपन्या असून वीज वितरणासाठी महावितरण आणि अन्य ९ खासगी वीज वितरण कंपन्या लायसन्सधारक आहेत. वीजवहन क्षेत्रात महापारेषणचा वाटा जवळपास ६८ टक्के आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

यावेळी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी महापारेषणच्या कामकाजाबाबत माहिती दिली. महापारेषणचे मुख्य अभियंता श्री. शशांक जेवळीकर यांनी सादरीकरण केले.



## *राज्य भार प्रेषण केंद्राची (SLDC) कार्ये*

इष्टतम निर्मितीचा आराखडा करणे





**ऐरोली :** येथील महापारेषणच्या आढावा बैठकीत बोलताना राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत. शेजारी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे, संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे, म.रा.वि.म. सूत्रधारी कंपनीचे तांत्रिक सल्लागार श्री. उत्तम झाल्टे व अन्य वरिष्ठ अधिकारी.

■ राज्य भार प्रेषण केंद्रात वीजकंपन्यासोबत बैठक ■

# आयलँडिंग प्रणालीमध्ये बदल व सुधारणा करण्याची गरज : ऊर्जामंत्री

■ *टीम महापारेषण, मुंबई*

``भविष्यात २०३० पर्यंत विजेची मागणी व पुरवठा लक्षात घेता त्या दृष्टीने वीज पारेषण व वितरणाचे नियोजन करावे लागेल. निर्मिती, भार, फ्रिक्वेन्सी, देखभाल हे घटक महत्त्वाचे आहेत. त्या अनुषंगाने वीजपुरवठा सुरळीत राहण्यासाठी आयलँडिंग प्रणालीमध्ये बदल व सुधारणा करण्याची गरज आहे,`` असे मत ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी मांडले.

ऐरोलीतील राज्य भार प्रेषण केंद्रात आयोजिलेल्या बैठकीत ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत बोलत होते. यावेळी ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव श्री. असीमकुमार गुप्ता, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे, संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे, सूत्रधारी कंपनीचे सल्लागार श्री. उत्तम झाल्टे, कार्यकारी संचालक (पारेषण) श्री. श्रीकांत राजूरकर, श्री. श्रीकांत जलतारे, मुख्य अभियंता श्री. शशांक जेवळीकर, श्रीमती जुईली वाघ, वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी यांच्यासह टाटा आणि अदानी कंपनीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

ऊर्जामंत्री डॉ. राऊत म्हणाले, ``१९८१ मध्ये आयलँडिंग प्रणाली अस्तित्वात आली. दि. १२ ऑक्टोबर रोजी टाटा कंपनीचे आयलँडिंग फेल कसे काय झाले? मुंबईत वीजपुरवठा सुरळीत होत नसेल तर मग आयलँडिंग प्रणालीचा उपयोग काय? त्याचा आढावा घेऊन वेळोवेळी योग्य ते बदल करण्यात आले होते काय? वीजपुरवठा खंडित का झाला? काय समस्या होती? हे अगोदर समजून घेतले पाहिजे. आयलँडिंग प्रणालीमध्ये बदल व सुधारणा करण्याची गरज आहे. आज मुंबईमध्ये साधारणतः ३८०० मेगावॉट विजेची गरज आहे. भविष्यात २०३० मध्ये साधारणतः ५००० मेगावॉट विजेची मागणी राहील. या सर्व बाबींचा सर्वंकष विचार करून योग्य त्या सुधारणा व बदल तसेच आधुनिकीकरण तातडीने करणे गरजेचे आहे.``



**ऐरोली :** येथील महापारेषणच्या राज्य भार प्रेषण केंद्रात भेट देऊन पाहणी करताना राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत. शेजारी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे, संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे, म.रा. वि.म. सूत्रधारी कंपनीचे तांत्रिक सल्लागार श्री. उत्तम झाल्टे व अन्य वरिष्ठ अधिकारी.

डॉ. राऊत म्हणाले, ``जगातील मोठ्या शहरात कोणत्या प्रकारच्या अत्याधुनिक व्यवस्था चोवीस तास वीजपुरवठा सुरळीत ठेवण्याकरिता तसेच अशा आपत्कालीन वेळी ग्रीड सुरक्षित ठेवण्याकरिता अस्तित्वात आहेत, याचा अभ्यास करून त्याप्रमाणे आपल्याकडील व्यवस्थांची उभारणी करण्यात यावी. यासाठी अभ्यासगटाचे नियोजन करण्यात यावे. यासाठी टाटा व अदानी कंपनीनेसुध्दा पुढाकार घ्यायला हवा. भविष्यात मुंबईत विजेची मागणी वाढणार आहे. त्यासाठी मुंबई आयलँडिंग प्रणालीचे विस्तारीकरण करता येईल काय? याबाबत चाचपणी करण्यात यावी. भविष्यात मुंबईच्या लोकसंख्येएवढी नवी मुंबई, ठाण्याची लोकसंख्या होईल. त्यासाठी विजेचे काय नियोजन करता येईल, याबाबतही विचार करावा. वीजपुरवठा सुरळीत राहण्यासाठी महाराष्ट्रातील इतर प्रमुख शहरांमध्ये योग्य त्या आधुनिक तंत्रज्ञान व यंत्रणेचा वापर करता येईल का, हे ही तपासावे. टाटा कंपनीची आयलँडिंग प्रणालीने योग्यरित्या काम केले असते तर दि. १२ ऑक्टोबर रोजी मुंबईतील वीजपुरवठा सुरळीत राहिला असता. भविष्यात मुंबईला अखंडित वीजपुरवठा देण्यासाठी टाटाने खबरदारी घ्यायला हवी.``

याप्रसंगी टाटा पॉवर कंपनीने सादरीकरण केले. त्यावर प्रधान सचिव (ऊर्जा) श्री. असीमकुमार गुप्ता, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे व पश्चिम क्षेत्रीय विद्युत समितीचे सदस्य सचिव श्री. एस. सत्यनारायण यांनी तांत्रिक बाबींचा सखोल ऊहापोह केला. प्रारंभी मुख्य अभियंता श्रीमती जुईली वाघ यांनी प्रास्ताविक केले. संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे यांनी आभार मानले.

**डिजिटल सेवा**

### ■ ई-सेवा पुस्तिकेचा ॲक्सेस एम्प्लॉई पोर्टलव्दारे ■

# महापारेषणच्या ई-सेवा पुस्तिका प्रणालीचे थाटात उद्‌घाटन



**मुंबई :** महापारेषण कंपनीच्या ई-सेवा पुस्तिका प्रणालीचे उद्‌घाटन करताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे. शेजारी श्री. संजय ताकसांडे, श्री. सुगत गमरे, श्री. सुधीर वानखेडे, श्री. राजू गायकवाड, श्री. शैलेंद्र दुर्गे, श्री. विजय विटेकर, श्री. मनोज जैयस्वाल, श्री. संतोष कडलग, कु. भावना कोळी.

■ *टीम महापारेषण, सांघिक कार्यालय*

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार महापारेषण कंपनीच्या ई-सेवा पुस्तिका प्रणालीचे उद्‌घाटन महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या हस्ते थाटात झाले. दिवाळीच्या निमित्ताने महापारेषणच्या सर्व कर्मचाऱ्यांना ई-सेवा पुस्तिकेचा ॲक्सेस एम्प्लॉई पोर्टलव्दारे देण्यात येत आहे. महापारेषणच्या ईआरपी आणि आय.टी. विभागाच्या संयुक्त विद्यमाने ही ई-सेवा पुस्तिका विकसित करण्यात आली आहे.

यावेळी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे म्हणाले, ``महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार महापारेषणने ई-सेवा पुस्तिका आधुनिक प्रणालीव्दारे विकसित केली आहे. प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याला आपली ई-सेवा पुस्तिका कंपनीच्या एम्प्लॉई पोर्टलवर पाहता येईल.`` यावेळी त्यांनी विकसित केलेल्या प्रणालीबद्दल समाधान व्यक्त करून टीममधील सर्व सदस्यांचे कौतुक केले. यावेळी संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, महाव्यवस्थापक (मा.सं. मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (आस्थापना) श्री. राजू गायकवाड, उपमहाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) (प्रभारी) श्री. शैलेंद्र दुर्गे, वरिष्ठ व्यवस्थापक (मा.सं.) श्री. अनिल कुमार, प्रणाली विश्लेषक श्री. विजय विटेकर, अतिरिक्त कार्यकारी अभियता श्री. मनोज जैयस्वाल, व्यवस्थापक (मा.सं.) श्री. संतोष कडलग, प्रोग्रॅमर कु. भावना कोळी आदी उपस्थित होते.

**वैशिष्ट्ये**

- ईआरपी-एसएपी प्रणालीव्दारे रियल टाईम स्वयं अद्ययावत ई-सेवा पुस्तिका
- १०० टक्के नॉन-एडिटेबल
- स्मार्टफॉर्म स्वरूपात उपलब्ध
- सर्व कर्मचाऱ्यांना ई-सेवा पुस्तिकेचा ॲक्सेस

---

**संविधान आहे महान, सर्वांना हक्क समान**



**मुंबई :** महापारेषणच्या सांघिक कार्यालयामध्ये भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून संविधान दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे व अन्य अधिकारी, कर्मचारी वर्ग.



**नागपूर :** अति उच्च दाब नि संवसु परिमंडळ, नागपूर येथे संविधान दिनानिमित्त भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करून राष्ट्रीय एकात्मतेची शपथ देण्यात आली. याप्रसंगी मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा. सं.) श्री. अभय रोही व अन्य अधिकारी वर्ग.

### ■ संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन ■

# महापारेषणमध्ये संविधान दिवस साजरा

■ *टीम महापारेषण, सांघिक कार्यालय*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीमध्ये (महापारेषण) भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून संविधान दिवस साजरा करण्यात आला.

सुरूवातीला महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या उपस्थितीत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. यावेळी संचालक (प्रकल्प) सर्वश्री रवींद्र चव्हाण, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) सुगत गमरे, कार्यकारी संचालक (पारेषण) श्रीकांत राजूरकर, महाव्यवस्थापक (मा. सं.मनुष्यबळ नियोजन) सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) राजू गायकवाड, महाव्यवस्थापक (विवले) सुनीलदत्त शर्मा, मुख्य अभियंता शशांक जेवळीकर, मुख्य अभियंता (स्थापत्य) शशांक जेवळीकर, कंपनी सचिव विनीता श्रीवाणी, मुख्य विधी सल्लागार शिवाजीराव पाटील यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---



*राज्य भार प्रेषण केंद्राची (SLDC) कार्ये*

पारेषण प्रणालीचे निरीक्षण व नियंत्रण करणे



# छायाचित्रांतून....

## थेट-भेट




**खारघर :** येथील ४०० के. व्ही. ग्रहण केंद्राला राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी भेट देऊन कामाचा आढावा घेतला. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य विद्युत सूत्रधारी कंपनीचे तांत्रिक सल्लागार श्री. उत्तम झाल्टे, मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी व अन्य अधिकारी वर्ग.

## मदतीचा हात




**नागपूर :** महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीला २८ लाख ५८ हजार रूपयांचा धनादेश राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, पशुसंवर्धन व दुग्धविकासमंत्री श्री. सुनील केदार यांच्या उपस्थितीत विभागीय आयुक्त डॉ. संजीवकुमार यांना देताना फेडरेशनचे अध्यक्ष श्री. मोहन शर्मा, सरचिटणीस श्री. कृष्णा भोयर, संयुक्त सचिव श्री. अब्दुल सादिक, श्री. किशोर हिवरकर आदी.

## सुरक्षेच्या साहित्याचे वाटप



**पडघे :** येथे महात्मा गांधी जयंतीदिनी स्वच्छता, सुरक्षा आणि जागृती सप्ताहानिमित्त कर्मचाऱ्यांना सुरक्षेच्या साहित्याचे वाटप करण्यात आले. प्रसंगी कर्मचाऱ्यांनी कार्यालय परिसराची स्वच्छता केली.

## भ्रष्टाचार मिटवा-नवा भारत बनवा



**नागपूर :** अउदा प्रकल्प नि. संवसु परिमंडळात दक्षता जनजागृती सप्ताहानिमित्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना भ्रष्टाचार निर्मुलनाची शपथ देण्यात आली. याप्रसंगी मुख्य अभियंता सर्वश्री महेंद्र वाळके, अधीक्षक अभियंता सतीश अणे, संजय आत्राम, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) अभय रोही, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) पीयूष चिक्षे, सहाय्यक मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी पी. बी. परचाके, उपव्यवस्थापक (मा.सं.) आर. एस. कुंभरे.

From the Desk of ED, HR

# कोरोना महामारीवरचा आमचा लढा




कोरोना महामारीमुळे मार्च २०२० पासून राज्यांमध्ये व संपूर्ण देशामध्ये लॉकडाऊन करण्यात आला. या महामारीच्या प्रारंभीच्या काळात लोकांमध्ये अत्यंत भीतीचे व तणावाचे वातावरण होते. आपली कंपनी अत्यावश्यक सेवेमध्ये असल्यामुळे लॉकडाऊन सुरू झाल्यापासून आपले सर्व अभियंते/टेक्निशियन/ऑपरेटर्स/कर्मचारी या तणावाच्या वातावरणातसुध्दा आपले कर्तव्य बजावित होते. किंबहुना, अनेक युनिटस आपल्या स्तरावर लोकांना सांगताना दिसले की, ``आम्ही कर्तव्य बजावण्याकरिता कामावर आहोत. तुम्ही आपले कर्तव्य बजावा आणि घरी बसा.`` (Stay Home, Stay Safe)

आमच्या या योध्द्यांनी संपूर्ण पारेषण यंत्रणा अविरत व सक्षम ठेवली. या दरम्यान, सर्वात जास्त ताण हा विद्युतक्षेत्रावर होता. कारण, विद्युत हे एक क्षेत्र लोकांना व्यग्र ठेवण्यास आघाडीवर होते. प्रशासनाने सुरूवातीपासून कोरोना महामारी संदर्भात मार्गदर्शक सूचना व नियोजन केले होते.

दरम्यान, एक कल्याणकारी योजना म्हणून कंपनीने सानुग्रह अनुदान योजना अंमलात आणली. या योजनेअंतर्गत सर्व अधिकारी, कर्मचारी तसेच कंत्राटी कर्मचारी यांना रूपये ३० लाख सानुग्रह अनुदान ज्यांचा दुर्दैवी मृत्यू कोरोना संसर्गामुळे झाला, त्यांना प्रदान करण्यात आले. तसेच इतर मदतकार्येसुध्दा प्रशासनातर्फे करण्यात आली. कोरोना संसर्ग झालेल्यांना मदत, वैद्यकीय सेवा, रुग्णवाहिका, भावनिक आधार, विलगीकरण कक्ष, अत्यावश्यक मदत तसेच रूग्णालयामध्ये बेड मिळविण्याकरिता मदत अशी अनेक मदतकार्ये सुरू केली.

महापारेषण कंपनीतर्फे लोकांमध्ये जनजागृती व्हावी, याकरिता एक चित्रफीत तयार करून ती समाजमाध्यमे (Social Media) व इलेक्ट्रॉनिक मीडियावर प्रदर्शित केली. ही चित्रफित पूर्णपणे अंतर्गत अधिकारी व कर्मचारी यांनी मिळून तयार केली होती.

औपचारिक पध्दतीने कोविड केंद्र उभारण्यात आले. संपूर्ण राज्यभरात त्याचा अनेकांना लाभ मिळाला. सांघिक कार्यालय, मुंबई येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांची सार्वजनिक वाहतुकीवरच्या परिणामाची दखल घेत व्यवस्थापनाने संपूर्ण अधिकारी व कर्मचारी वर्गास कोविड ॲन्टीजन टेस्टही कंपनी खर्चातून करून घेतली. या टेस्टसोबत आरोग्यविषयक अनेक चाचण्याही करून घेतल्या. त्याचा आमुलाग्र फायदा सांघिक कार्यालय, मुंबई येथील अधिकारी व कर्मचारी वर्गास झाला. देशातील अग्रगण्य अपोलो क्लिनीकमार्फत या चाचण्या घेण्यात आल्या.

मार्च २०२० पासून सुरू झालेल्या लढ्यास आपण सर्वांनी चांगले सहकार्य केले. त्याकरिता आपल्या सर्वांचे मन:पूर्वक आभार.आपल्या सर्वांच्या चांगल्या कामगिरीमुळे व सहकार्यामुळे आपल्या कंपनीमध्ये कोविड-१९ चा संसर्ग अतिशय अल्प प्रमाणात राहिला. आता मात्र, या महामारीबाबत लोकांमध्ये भीती व तणाव मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. पण, यापुढेही निष्काळजी बाळगून चालणार नाही. कारण, धोका अजूनही पूर्णपणे टळला नाही. त्यामुळे आपण सर्वांनी आपला लढा असाच पुढे चालू ठेवावा. या संदर्भात आपणास काही सुचवायचे असेल तर, कृपया प्रशासनास त्याबाबत कळवावे.

**शुभेच्छांसह..!**

**- सुगत गमरे**

**कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)**


संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.


The Company accepts no responsibility for the matter published in the journal.